अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या सन २०१९-२० च्या मानकांनुसार राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारील शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये येथील शिक्षकीय पदांची निर्मिती करण्यास मान्यता देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-११११/(१८०/१९)/तांशि-२,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम काम रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९

<u>संदर्भ</u> :- १)उच्च शिक्षण विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे क्रमांक F.९-९/२०१९-U II, दिनांक १७ मे, २०१९ चे पत्र.

२) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी सचिव, उच्च शिक्षण विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार यांना लिहीलेले क्रमांक D.O. Misc. -२०१९/CR-७०/EST.II, दिनांक १६ जुलै, २०१९ चे पत्र.

३) वित्त विभाग उपसमितीच्या दिनांक १६ जुलै, २०१९ झालेल्या बैठकीचे इतिवृत्त क्रमांक पदनि-२०१९/प्र.क्र.५८/आपुक, दिनांक ३०.०७.२०१९

४) शासन पत्र क्रमांक संकीर्ण-११११/(१८०/१९)/तांशि-२, दिनांक १६ ऑगस्ट, २०१९

५) वित्त विभाग उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनाक २९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.पदनि-२०१९/प्र.क्र.६५/१९/आपुक, दि.०९/०९/२०१९.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने त्यांच्या दिनांक १७.०५.२०१९ च्या पत्रान्वये राज्य शासनाच्या अखत्यारितील शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या १००% पदभरतीच्या अनुषंगाने कृती आराखडा (१००% Day action Plan) तयार करून तो त्वरीत केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयास पाठविण्याबाबत कळविलेले आहे. त्याअनुषंगाने, संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी राज्यातील उच्च शिक्षण संस्थांतील रिक्त पदांच्या भरतीच्या अनुषंगाने करण्यात येणा-या कार्यवाही बाबत केंद्र शासनास आवगत केलेले आहे.

केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने त्यांच्या दिनांक १७.०५.२०१९ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने राज्यातील तंत्रशिक्षणाशी संबंधीत संस्थांमधील रिक्त पदे भरण्यास व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या सन २०१९-२० च्या निकषानुसार नव्याने पदे निर्माण करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव, नवीन पदनिर्मिती/पदांचे पुनरुज्जीवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावांची सखोल तपासणी करून शिफारशी करण्यासाठी तसेच काल्पनिक पदे निर्माण करण्यास व रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्याकरिता गठीत केलेल्या उपसमितीच्या दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी झालेल्या सन २०१९ मधील चौदाव्या बैठकीसमोर ठेवण्यात आला होता. सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला होता :

"उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त शासकिय, अशासकिय अनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठातील शिक्षकिय पदांच्या आकृतीबंधाचा प्रस्ताव उपसमितीच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता. उपसमितीने AICTE च्या सन २०१९ च्या निकषानुसार सुधारित आकृतीबंध निश्चित करणे, काही पदे रद्द करणे व काही नविन पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समिती समोर सादर करण्याची शिफारस केली. तसेच सध्या मंजूर पदांपैकी रिक्त असलेली शिक्षकिय पदे भरण्यास उपसमितीने मान्यता दिली आहे. नव्याने निर्माण करण्याचे प्रस्तावित असलेली पदे उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनंतरच भरता येतील."

उपसमितीची उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने, तंत्रशिक्षण संस्थांतील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय व कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांना कळविण्यात आलेले आहे.

तसेच, नवीन पद निर्मितीची प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तर समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्याचे निर्देश दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये देण्यात आले होते. त्याअनुषंगाने, राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी महाविद्यालये, अशासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी महाविद्यालय, अशासकीय वास्तुशास्त्र महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील संवैधानिक पदे, पदवी व पदविका स्तरावरील पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तर समितीच्या दिनांक २९.०८.२०१९ च्या बैठकीमध्ये मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदरच्या बैठकीचे इतिवृत्त संदर्भ क्रमांक ५ येथील पत्रान्वये निर्गमित करण्यात आले असून उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली असणा-या संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या निर्मितीस उच्चस्तर समितीने मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता आणि उच्च स्तर समितीने दिलेली मान्यता विचारात घेता राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर पदवी स्तरावरील शिक्षकीय पदांच्या निर्मितीस मान्यता देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर पदवी स्तरावरील शिक्षकीय पदांच्या निर्मितीस खालील तक्त्यामधील रकाना क्रमांक ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे १४४ शिक्षकीय पदांपैकी सहायक प्राध्यापक (ग्रेड पे रु. ६०००) या संवर्गातील ६५ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, इतर ७९ पदे ही ग्रेड वेतन रु. ७६००/- पेक्षा जास्त असल्याने सदर पदांच्या निर्मितीकरिता मंत्रिमंडळाची मान्यता स्वतंत्ररित्या घेण्यात येईल. मंत्रीमंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर पदांच्या निर्मितीबाबतचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय (पदवी व पदव्युत्तर पदवी)

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	पदनाम	सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी	सन २००४ च्या आढ़ाव्यानुसार मंजूर पदांची संख्या	नवीन निर्माण करावयाच्या पदांची संख्या	व्यपगत करावयाच्या पदांची संख्या	AICTE च्या निकषानुसार मंजूर करावयाचा आढ़ावा
	२	३	४	५	६	७	८
अ)	**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (पदवी)**	प्राचार्य	३७४००-६७००० AGP (१००००)	८	+०१	००	९
		प्राध्यापक	३७४००-६७००० AGP (१००००)	१०९	००	-३६	७३
		सहयोगी प्राध्यापक	३७४००-६७००० AGP (९०००)	२४७	००	-६७	१८०
		सहाय्यक प्राध्यापक	१५६००-३९१०० AGP (६०००)	६०१	००	-८१	५२०
	एकूण			**९६५**	**+०१**	**-१८४**	**७८२**
ब)	**शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय (पदवी)**	प्राचार्य	३७४००-६७००० AGP (१००००)	४	००	००	०४
		प्राध्यापक	३७४००-६७००० AGP (१००००)	४	+०३	००	०७
		सहयोगी प्राध्यापक	३७४००-६७००० AGP (९०००)	१४	००	००	१४
		सहाय्यक प्राध्यापक	१५६००-३९१०० AGP (६०००)	३१	+०६	००	३७
	एकूण			**५३**	**०९**	**००**	**६२**
क)	**शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय फार्म डी- (पदवी)**	प्राध्यापक	३७४००-६७००० AGP (१००००)	००	+०८	००	०८
		सहयोगी प्राध्यापक	३७४००-६७००० AGP (९०००)	००	+०८	००	०८
		सहाय्यक प्राध्यापक	१५६००-३९१०० AGP (६०००)	००	+०८	००	०८
	एकूण			**००**	**+२४**	**००**	**२४**
ड)	**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (पदव्युत्तर पदवी)**	प्राध्यापक	३७४००-६७००० AGP (१००००)	२६	+२४	००	५०
		सहयोगी प्राध्यापक	३७४००-६७००० AGP (९०००)	२७	+२३	००	५०
		सहाय्यक प्राध्यापक	१५६००-३९१०० AGP (६०००)	०१	+४८	००	४९
	एकूण			**५४**	**+९५**	००	**१४९**
इ)	**शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय (पदव्युत्तर पदवी)**	प्राध्यापक	३७४००-६७००० AGP (१००००)	००	+०६	००	०६
		सहयोगी प्राध्यापक	३७४००-६७००० AGP (९०००)	००	+०६	००	०६
		सहाय्यक प्राध्यापक	१५६००-३९१०० AGP (६०००)	००	+०३	००	०३
	एकूण			००	**+१५**	००	**१५**
	एकूण (अ+ब+क+ड+इ)			**१०७२**	**+१४४**	**-१८४**	**१०३२**

२. उपरोक्त परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमूद तक्त्यातील रकाना क्रमांक ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे १८४ पदे (प्राध्यापक -३६, सह.प्राध्यापक - ६७, सहायक प्राध्यापक - ८१) व्यपगत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. उपरोक्त तक्त्यामधील रकाना क्रमांक ६ मध्ये नमूद केलेली नव्याने निर्माण करावयाच्या १४४ पदांपैकी ६५ सहायक प्राध्यापकांचा संस्थानिहाय आणि संबंधीत संस्थेतील विषय निहाय पदनिर्मितीचा तपशील

संचालनालयाने शासनास तात्काळ सादर करावा. सदर पदनिर्मिती करताना संस्थेतील प्रत्येक पदासाठीचा उपलब्ध कार्यभार, विद्यार्थी संख्या, विषय संख्या यांचा सविस्तर आढावा घेऊन कार्यवाही करावी.

४. उपरोक्त परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमूद तक्त्यातील रकाना क्रमांक ७ मध्ये नमूद केलेली व्यपगत करावयाच्या १८४ पदांचा संस्थानिहाय व संबंधीत संस्थेतील विषय निहाय तपशील संचालनालयाने शासनास सादर करावा.

५. पदनिर्मिती व पदे व्यपगत करताना पदांची एकूण संख्या ही उपरोक्त परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमूद तक्त्यातील रकाना क्रमांक ८ मध्ये नमूद केलेल्या एकुण पदांच्या संख्येपेक्षा जास्त असणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. नव्याने निर्माण करण्यात येणा-या पदांच्या वेतनावरील खर्च खालील लेखाशीर्षामधून भागाविण्यात यावा. यासाठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद विधीमंडळाच्या पुढील अधिवेशनात विहीत मार्गाने करण्यात यावी.

"*मागणी क्र. डब्ल्यू-९-२२०३ तंत्रशिक्षण, ११२ अभियांत्रिकी/तंत्र महाविद्यालये संस्था (००) (०१) शासकीय अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र महाविद्यालये (वसतिगृहांसहित) (अनिवार्य) ०१, वेतन - २२०३०३२७*"

७. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक : ४५६/आपुक, दि.१३/०९/२०१९ व क्रमांक : ३७१/२०१९/सेवा-९, दिनांक १६/०९/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९११२०१३०४६५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Satish Jagdeorao Tidke

Digitally signed by Satish Jagdeorao Tidke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=abbed596652773468508d937a99472988ebdda28db8c543b79abe527c99646f6, cn=Satish Jagdeorao Tidke
Date: 2019.09.19 12:02:20 +05'30'

(सतीश ज. तिडके)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मंबई-१/नागपूर-२,
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), मंबई-१/नागपूर-२,
६. निवासी लेखा परीक्षा, मुंबई,
७. संचालक, लेखा व कोषागार संचालनालय, मुंबई,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालनालयामार्फत),

१०. वित्त विभाग, सेवा-९/आपुक, मंत्रालय, मुंबई,

११. प्राचार्य, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),

१२. प्राचार्य, सर्व शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),

१३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग/कार्यासन क्रमांक तांशि-१,३,७ मंत्रालय, मुंबई,

१४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,

१५. मा.रा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,

१६. निवड नस्ती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/तांशि-२.